HP 22-23

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता®

तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित,

## तेरणा महाविद्यालय (कला, विज्ञान व वाणिज्य), उस्मानाबाद

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व मराठी विभाग आयोजित

### एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र (आभासी)

शनिवार, दिनांक 4 फेब्रुवारी 2023

## समकालीन साहित्य आणि समकालीन प्रश्न

(विशेष संदर्भ 2000 नंतरचे साहित्य)

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. अशोक मोलकर

संपादक
डॉ. भारत हंडीबाग

सह-संपादक
डॉ. तुळशीराम उकिरडे

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

Scanned with OKEN Scanner

NUTAN MAHAVIDYALAYA SELU



42) समकालीन कादंबरीतील शेतकरी जीवनजाणिवा ||165
प्रा. डॉ. समाधान पसरकल्ले, उमरगा

43) इ.स. २००० नंतरच्या मराठी दलित आत्मकथनांतील दलितांचे प्रश्न ||170
घनश्याम प्रल्हाद देवरे, प्रा. डॉ. सुनील अभिमान अवचार, मुंबई

44) समकालीन साहित्य आणि मराठी भाषाविषयक प्रश्न.... ||176
राजीव के. आरके, धुळे

45) कवी शिवाजी शिंदे यांच्या कवितेतून अधोरेखित झालेले मानवी.... ||180
प्रा. डॉ. तुळशीराम उकिरडे, उस्मानाबाद

46) आदिवासी समाजाच्या समस्या व आव्हाने ||184
प्रा. डॉ. संजय गंगाराम सुरेवाड, अंबाजोगाई, जि. बीड

47) समकालीन निवडक स्त्रियांच्या मराठी कवितेतील स्त्री प्रश्नांची.... ||188
नरवडे सारिका सुर्यकांत, औरंगाबाद

48) समकालीन साहित्य आणि शेतकऱ्याचे प्रश्न ||190
प्रो. डॉ. आर. एस. शिंदे, कोकरे तुकाराम सिताराम, जालना

49) आदिवासी पारधी जमातीमधील व्यसनाधिनता समस्या — कारणे, परिणाम व उपाय ||193
शहारूख फारूख शेख, कळंब

50) समकालीन साहित्य आणि राजकारण ||196
कवी सुधीर विलास आगाशे, पाटोदा जि. बीड

51) समकालीन अस्वस्थतेचा हुंकार: मी संदर्भ पोखरतोय ||198
डॉ. राजाराम अं. झोडगे, सेलू जि.परभणी

52) शेताच्या मरणाची गोष्ट : समकालीन शेतकरी प्रश्नांचा सातबारा ||201
अरविंद विजय हंगरगेकर, उस्मानाबाद

53) समकालीन मराठी कादंबरीतील पाणी समस्या : विशेष संदर्भ: तहान ||204
सुरवसे तुकाराम नागनाथ, औरंगाबाद

54) मराठी ग्रामीण कादंबरी आणि शेषीनीष्ठ जीवनातील प्रश्न ||207
राजकुमार श्रीधर पवार, औरंगाबाद

55) तृतीयपंथी यांच्या वेदनेचा जाहीरनामा : कुरूप ||210
भरत शिवाजीराव गायकवाड, औरंगाबाद

56) GAME OF THRONES: AN ATTEMPT TO TRANSMIT CURRENT ISSUES ||215
Mr. Bhagvat R. Dhesale, Dr. Umesh D. Kamble, Newasa, Dist. Ahmednagar

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com



PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU. Dist. Parbhani

Scanned with OKEN Scanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

Jan. To March 2023
Special Issue -II



51

# समकालीन अस्वस्थतेचा हुंकारः मी संदर्भ पोखरतोय

**डॉ. राजाराम अं. झोडगे**
मराठी विभागप्रमुख,
नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी

************

१९९० नंतरचा काळ हा मानवी जीवनाला एक वेगळे वळण देणारा ठरला आहे. या काळात भौतिक, मानसिक, भावनिक स्थित्यंतरे घडून आली. तंत्रज्ञान, जागतिकीकरण यामुळे जग जवळ आले पण आपल्या जवळची माणसं भावनिक दृष्ट्या जवळ राहिली का? असा प्रश्न उपस्थित व्हावा अशी स्थिती आहे. गरीबी—श्रीमंतीतील दरी कमी झालीच नाही. एकीकडे चंगळवाद,अमर्याद भौतिक सुविधा,प्रचंड संपत्ती आणि दुसरीकडे पोटासाठी वणवण फिरणारा,मोठमोठे हॉटेल्स, रस्त्यावरील सुसज्ज दुकाने,नेत्यांची खोटी आश्वासने याकडे आशाळभूतपणे पाहणारा सामान्य माणूस. या सामान्य माणसाकडे कोणाचेही फारसे लक्ष गेले नाही.परंतु, साहित्याने मात्र त्याच्या व्यथा—वेदनांना चव्हाट्यावर मांडण्याचा प्रयत्न केला. या काळातील अनेक कवी, कथाकार, कादंबरीकार यांनी सामान्य माणसाला,त्याच्या जगण्याला आपल्या लेखनातून मुखर केले.

इ.स. २००० नंतरचा काळ हा तर प्रचंड वेगवान असा काळ आहे.मानवी जीवनातला हा वेग दोन पातळ्यांवरचा आहे.— एक म्हणजे जगण्यासाठी प्रचंड वेगाने धावणारा नाहीरे वर्ग तर दुसरा म्हणजे सामान्य माणसाच्या अनेकपट वेगाने संपत्ती जमा करणारा,सुखविलासात राहणारा आहेरे वर्ग. सामान्य माणसाचं जगणं असह्य करणाऱ्या समकाळाची स्पंदनं टिपणारी कविता मराठीत लिहिली गेली. नव्या दमाच्या तरुण कवींकडून समकालीन वास्तवाची चिरफाड करून सत्य समोर आणण्याचे जोरकस प्रयत्न होत आहेत. तरुण वयातील कविता म्हटली की ती प्रेमाचीच असणार या समजाला धक्का देत सामाजिक आशयाला पोटात घेणारी वास्तवदर्शी कविता या वर्गाकडून लिहिली जात आहे. याबाबत कवी,समीक्षक पी.विठ्ठल म्हणतात— आजच्या तरुणांची कविता ही पुष्कळच प्रयोगशील आहे. त्यांना देशी जाणिवांचे उत्तम भान आहेच आणि त्याचवेळी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अवकाशाचीही जाणीव आहे. मानवी जगण्यावर आघात करणाऱ्या, त्याच्या अस्तित्वाला पुसू पाहणाऱ्या समग्र व्यवस्थेवर हे कवी बोलत आहेत. आपल्या भोवतालाचे आणि काळाचे उत्तम वाचन असणाऱ्या या कवींची वैचारिक आंदोलने, भावनिक,मानसिक अस्वस्थता आणि यांतून निर्माण होणारे अनेक पिळ आणि पेच हे कवी प्रभावीपणे मांडत आहेत.घ विनायक पवार,कल्पना दुधाळ,वीरा राठोड,अभय दाणी,अरुण पवार,विनायक येवले असे अनेक कवी या पिढीतील सांगता येतील. या नवतरुण कवींतीलच पवन नालट हे एक आश्वासक नाव. नुकताच त्यांच्या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमी युवा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

पवन नालट यांचा श्मी संदर्भ पोखरतोय हा पहिलाच काव्यसंग्रह फेब्रुवारी, २०२१ मध्ये राजहंस प्रकाशन कडून प्रकाशित झाला. यात एकूण साठ कविता आहेत. संवेदनशीलतेने ओतप्रोत भरलेल्या या कविता समकालीन व्यवस्थेकडे तटस्थपणे पाहत सामान्य माणसाची बाजू घेतात. समकालीन सामाजिक, राजकीय, शैक्षणिक पर्यावरणाचा ढासळता तोल आणि मनाच्या अस्वस्थतेचा वेध घेत सामाजिक अरिष्ठाला पोखरण्याचे काम ही कविता करते.

समकालीन राजकीय स्थितीबाबत कवी कमालीचा अस्वस्थ आहे. १९४७ ला आपल्याला स्वातंर्त्य मिळालं पण पुढे काय? मला खरंच स्वातंत्र्यात असणारे हक्क मिळालेत का? असा प्रश्न कवी उपस्थित करतो. राज्यघटनेने बोलण्याचा अधिकार दिला पण आज मुक्तपणे मी बोलू शकतो का? याबाबत श्लिलावर या कवितेत कवी म्हणतो—

मी जगतोय स्वातंत्र्यात
भोगतोय गुलामी स्वतंर्त्याची
मला नाही हक्क
इथल्या व्यवस्थेत बोलण्याचा
तरी मी अभिव्यक्तीच्या
अधिकाराची मालकी

f[ K kr ?kå u fQjr v l r ks ¼i -२६)

अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर येणारी बंधने यामुळे मी स्वातंत्र्याचीच गुलामी भोगतोय अशा प्रकारची खंत कवी व्यक्त करतो. इथे रक्तरंजित सारीपाटावर



PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU. Dist. Parbhani

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

Scanned with OKEN Scanner

मतांचे राजकारण चाललेले असते. अस्मितेच्या भयाण झालेल्या चेहऱ्यावर कुरघोडयांनी शस्त्रे सपासप वार करत असतात अन् तरीही आपण निर्विकारपणे बघ्यांची भूमिका घेत असतो. व्यवस्थेपुढे आपण हतबल झालो आहोत. एकीकडे स्वातंत्र्य आहे पण बोलता येत नाही. समोर दिसते आहे पण ते खाता किंवा घेता येत नाही. स्वाभिमान हा स्थायीभाव आहे पण स्वाभिमानाने जगता येईल अशी परिस्थिती नाही. अशा स्थितीत एक्वेरियम मधल्या सुंदर दिसणाऱ्या माशांप्रमाणे आपण जगतोय की मरतोय तेच कळत नाही हे वास्तव कवी मांडतो.

लोकांची, लोकांसाठीची लोकशाही आहे पण ती नावालाच. लोकशाही या गोंडस नावाखाली शाही लोकांचीच शाई येथे काम करते आणि सर्वसामान्य माणूस मात्र नेहमीच नागवला जातो. सोपस्कार या कवितेत कवी लोकशाहीची होणारी विटंबना चित्रित करतो. मुखवटे पांघरलेले आपलेच लोक आपल्याच माणसांचा अवसानघात करतात. बोकडाला कापण्यापूर्वी जसा सुक्या मेव्याचा मलिदा खाऊ घातला जातो तसाच इथल्या माणसांना आश्वासनांचा खुराक देऊन पुन्हा लोकशाही नावाच्या करवतीवर त्यांची मान कापली जाते. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली परंतु अजूनही निवडणुकीत तेच प्रश्न,त्याच समस्या आणि तेच नेते हे चक्र चालू आहे.

निवडणुकीत मतांच्या गणितांसाठी जात,धर्म शोधले जातात. विकासाच्या मुद्द्यांपेक्षा भावनिक मुद्दे पुढे करून निवडणुका जिंकल्या जातात. जुन्याच मुद्द्यांना नवीन खोळी चढवून सामान्य माणसांच्या शोषणाची व्यवस्था निर्माण केली जाते. जिथे माणसांच्या जगण्याचे, खाण्याचे,स्वातंत्र्याचे,विकासाचे प्रश्न प्रलंबित आहेत तिथे पुतळ्यांचे,महापुरुषांचे राजकारण करून लोकांना त्यांच्या मूळ प्रश्नांपासून दूर ठेवले जाते. स्टेजवरून समानतेच्या गप्पा मारल्या जातात.त्यावर उतारेच्या उतारे छापले जातात पण प्रत्यक्षात काय? कवी म्हणतो—

धर्मात जात
जातीत पोटजात
पोटजातीत गट
गटात नागरिक
नागरिकशास्त्र
शेवटी शेण खातं (पृ.४०)

जाहीर सभांमधून मारलेल्या गप्पा पोकळ राहतात आणि वेळेवर आपल्या सोयीचे राजकारण केले जाते. लालफीतशाहीत सर्वसामान्य माणसाचं जगणं मुश्किल होऊन जातं. एका कामासाठी सरकारी कार्यालयांचे, नेत्यांचे झिजवावे लागणारे उंबरठे, जोडे व्यवस्थेला दिसतच नाहीत. दुसऱ्या दृष्टीने एखादी फाईल ही केवळ कागदांची फाईल असते परंतु त्यात सर्वसामान्य माणसाच्या जगण्याचं सर्वस्व सामावलेलं असतं हे कधी कळणार लालफितशाही या कवितेत कवी म्हणतो, मंत्रालयाला लागलेल्या आगीत फक्त फायली नाही जळाल्या साहेब, तर कुणाच्या नोकरीची, कुणाच्या संसाराची, खंगलेल्या आई—बापाच्या उपचारासाठी लागणाऱ्या सोयींची स्वप्नंही जळून खाक झाली. पण त्याने तुम्हाला काय फरक पडणार म्हणा. मंत्रालयाच्या जळालेल्या भिंती पुन्हा चकचकीत झाल्या. इटालियन मार्बलने साहेबांची केबिनही पुन्हा चकाकू लागलीये. पण चकरा मारून मारून थकलेल्या माझ्या बापाच्या आत्म्याचं काळवंडलेपण तुम्ही मिटवू शकाल का साहेब? असा प्रश्न कवी उपस्थित करतो.

राजकीय दुरावस्थेबरोबरच शिक्षण क्षेत्रातील अनागोंदी यावरही या कवितासंग्रहाच्या माध्यमातून कवी काही एक सांगू पाहतोय. शाळेचे बदललेले अंतर्बाह्य रुप इथपासून ते शाळेत शिकवला जाणारा अभ्यासक्रम याबाबत कवी अस्वस्थ आहे. शाळा काही नोंदी या दीर्घ कवितेतून कवीने शिक्षणक्षेत्रातील मूल्यऱ्हास, बोकाळलेला भ्रष्टाचार, अनागोंदी यावर भाष्य केले आहे. शिरजोर झालेले व्यवस्थापन, पैशांपुढे अडगळीत पडलेले सरकारी नियम, शिक्षणक्षेत्रातल्या ठेकेदारांकडून होणारा भ्रष्टाचार तसेच आपल्या पगाराला हातही न लावता पोषण आहारावर ताव मारणाऱ्या असुरांच्या कमनि रंग उडालेल्या शाळेच्या भिंती आ वासून बघतायत. ग्रामीण भागातील सरकारी शाळांची अवस्था तर फारच बिकट आहे. शाळेच्या आवारात पत्त्यांचा डाव, मटन पार्टी इ. चालू आहे. शाळेच्या पाठीमागे आता दारुच्या रिकाम्या बाटल्या,वापरलेले कंडोम सापडताहेत. शाळेच्या दुरावस्थेमुळे कवीचे मन पेटून उठतं आणि तो म्हणतो—

रक्त पेटून उठतं माझं
शाळेवर दररोज बलात्कार
करणाऱ्या दलालांचे वर्तन पाहून
मला नाही उभारावा वाटत
स्वातंत्र्याचा पावन तिरंगा
ज्ञानाचा व्यापार करणाऱ्यांच्या दलदलीत (पृ.५६)

कवीला आता शाळेच्या वेशीवरही यावंसं वाटत नाही कारण तिथे त्याला पुढील पिढीच्या रक्ताचा वास येतो यातून कवीने शिक्षणक्षेत्राच्या झालेल्या दुरावस्थेवर कठोर प्रहार केले आहेत.



PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

बाईचं जगणं दहा कविता या दीर्घ कवितेतून कवी पवन नालट यांनी स्त्रियांचे शोषण, दुरावस्थेचा वेध घेतला आहे. संसाराची कणिक मळता मळता तिचे जगणेच कसे कणिक होऊन जाते यावर कवी बोलतो. स्त्री स्वत:साठी जगतच नाही. संसाराचं रहाटगाडगं ओढता ओढता ती झिजून जाते. नवऱ्याने बेदम मारूनही त्याच्या ओठाची आणि पोटाची भूक भागवणारी बाई पेटून गेलेली असते कधीचीच.ती सगळ्यांसाठी करते पण तिच्यासाठी कोण? बाईचा जन्म हा पातीव्रत्याच्या आंधळ्या संकल्पनेवर पेटत्या लाकडासारखा धगधगत असतो. पुरुषप्रधान व्यवस्था आणि त्यात स्त्रीचे निम्न स्तरावरचे जगणे यासंबंधी कवी व्यक्त होतो.

स्त्री आणि पुरुष ही संसार रथाची दोन चाकं आहेत पुरुष या कवितेतून कवीने पुरुषाचे अभेद्यपण, त्याचा विशालपणा, दु:ख बाजूला सारून महत्त्वाची मानलेली कर्तव्यपरायणता यातून कवीने एक पुरुष सूक्त गायले आहे. या संग्रहातील सर्वच कविता काहींना काही सांगणाऱ्या, व्यवस्थेवरष त्यातील उणेपणावर भाष्य करणाऱ्या आहेत. या संग्रहातील कवितांच्या निर्मिती प्रक्रियेविषयी बोलताना कवी म्हणतो की मी संदर्भ पोखरतोय कवितासंग्रहातील कविता म्हणजे अनुभवात भिजून आत्मशोधाच्या प्रवासाकडे निघालेल्या मानवी वृत्तीचा शोध आहे. विचारवंतांच्या झालेल्या हत्या, सामाजिक, राजकीय स्थितीत हतबल झालेला माणूस, माणसाच्या अस्तित्वाची क्षणभंगुरता आणि परधर्मातील सहिष्णुता या सर्वांचा वेध मी संदर्भ पोखरतोय कविता संग्रहाच्या माध्यमातून काव्यमूल्य जपत मी घेतलेला आहे

स्वातंत्र्यातही गुलामीचे जीवन जगावे लागणाऱ्या परिस्थितीत इथल्या अर्थकारणाशी, समाजकारणाशी, संस्कृतीशी कवी सतत लढत असतो कारण त्याने अजून त्याच्या आत्म्याचा लिलाव केलेला नाही. तो इथल्या सर्वसामान्य माणसाचा एक प्रतिनिधी आहे. कवितासंग्रहाच्या शीर्षकातील मी हा व्यक्तिवाचक नसून तो समष्टीवाचक आहे. मी कोण? या प्रश्नाचे उत्तर देताना कवी म्हणतो व्यवस्थेच्या तुटलेल्या पादत्राणांना जोडणारा मी एक खिळा आहे. तो जोडण्याचे काम करतो. अशा प्रकारे या कवितासंग्रहातून कवीने मानवतेचं मूल्य अधोरेखित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. समकालीन वास्तवात सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अंगाला भिडणाऱ्या निरनिराळ्या अवस्थांच्या कविता या संग्रहात आलेल्या आहेत. त्याचबरोबर काही वैयक्तिक संवेदनांना आपल्या मनाच्या कोपऱ्यात जागा देणाऱ्या मुडस् च्या छटापण या कवितेतून जाग्या होताना दिसतात. या सगळ्या मनाच्या प्रतलावर आपली एक भूमिका मांडताना हा कवी दिसत राहतो. समकालीन परिस्थितीत सर्वसामान्य माणसाचं अगतिक, असहाय जगणं मांडून, त्याच्याबाजूनं उभ राहणारी कविता लिहिणाऱ्या पवन नालट यांचा येणारा काळ आश्वासक असेल यात शंका नाही.

## संदर्भ

१) पी.विठ्ठल, मराठी कविता समकालीन परिदृश्य, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद. २०१६ पृष्ठ ६२–६३.

२) नालट, पवन, अस्तित्वाच्या कोवळ्या देठासाठी, लोकसत्ता (लोकरंग पुरवणी) दि.८ जानेवारी २०२३ पृ.क्र.३

३) काळे,दा.गो., मी संदर्भ पोखरतोय (पवन नालट), राजहंस प्रकाशन प्रा.लि. पुणे प्र.आ.१ फेब्रुवारी २०२१ पृ.१८

❑❑❑



NUTAN MAHAVIDYALAYA SELU
PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU. Dist. Parbhani
Scanned with OKEN Scanner